# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २४.०४.२०२६ शुक्रवार**

(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :-**

दिनांक २३.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये २६ केसेसमध्ये २६ ईसमावर कारवाई करून एकुण ९३,९४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमधे ०२ आरोपींवर कारवाई करुन १,१९५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९२५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४९,१५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— अवैध ई—सिगारेट विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत.

दिनांक २३.०३.२०२६ चे २१.५० वा. ते २३.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, बाबा बुध्द नगर, गल्ली नं. ०२, डॉ. आंबेडकर मार्ग, येथे राहणारा ईसम नामे वैभव विकास कांबळे, वय २९ वर्षे, याचे घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याचे ताब्यात वेगवेगळ्या कंपनीचे व वेगवेगळ्या फ्लेवर्सचे शासन प्रतिबंधीत ई—सिगारेट चे एकुण ११२ नग किंमती २,०२,०००/— रू. चे मिळून आले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना प्रतिबंधीत वेगवेगळ्या फ्लेव्हरच्या ई—सिगारेटचा विक्री करीता साठा बाळगुन मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन वर नमुद ई—सिगारेट, एक डिओ डिलेक्स मोपेड गाडी, व एक मोबाईल असा एकुण ३,३२,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीचे विरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे कलम ४,५,७,८ ई—सिगारेट प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा)

यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोनि. गजानन गुल्हाने, सपोनि संदीप जाधव व पथकाने केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे लकडगंज :— दुकान फोडणारे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी दिपेश दिनेश सचदेव, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. २०३, साई रेसीडेन्सी समोर, लकडगंज, नागपुर यांचे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, जमुना सोसायटी नं. ०१, एस.बी.आय. बॅकेच्या बाजुला आंबेडकर चौक जवळ, नागपुर येथे आयुश सचदेव मेन्सवेअर नावाचे रेडीमेट कपड्यांचे दुकान आहे. दिनांक २२.०४.२०२६ चे २१.३० वा. ते २३.०४.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे दुकानाचे शटरला कुलूप लावून आपले घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटरचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून दुकानामध्ये ठेवलेले वेगवेगळ्या डिझाईनचे ब्लेझर आर्टीकल, डिझायनर कुर्ते, कापडाचे गठ्ठे असा मुद्येमाल तसेच शेजारील जय हनुमान अपार्टमेन्ट मधील शॉप नं. जी—१/२ मधून रोख १२,०००/—रू. असा दोन्ही दुकानांमधुन एकुण ७,८०,२००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. सोनल शिंदे ९८९२२६८६२४ यांनी अज्ञात दोन आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४), भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे शांतीनगर :— बनावट औषधांचा साठा व विक्री करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी प्रशांत राजेंद्र रामटेके, वय ४९ वर्षे, हे अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, विभागात औषध निरीक्षक या पदावर कार्यरत आहेत. फिर्यादी यांना औषध निरिक्षणादरम्यान, आरोपी क्र. १) मेसर्स हिताशी फॉर्मास्युटीकल्स, शॉप नं. ११, तळमजला, घर क्र. १०९८ ए/एय/११ वार्ड नं. २२ तुलसी अपार्टमेन्ट, तुलसी नगर कॉलोनी, शांतीनगर, नागपूर येथे ''**Albure**'' या बनावट औषधांचा साठा विक्रीसाठी करून ठेवल्याचे निदर्शनास आले. आरोपी क्र. १ औषध निर्माते यांनी आरोपी औषध निर्माते २) मेसर्स एन.आर.एन. मित्र डिस्टीब्युटर्स, मुंबई २२, ३) मेसर्स एन.आर.मित्र डिस्टीब्युटर्स, हैद्राबाद, तेलंगणा—३५, ४) मेसर्स आर.आर.टी. फार्मा., पनवेल, नवी मुंबई—०९, ५) दानिश खान, दिल्ली, ६) राजुकुमार मिश्रा, चंदीगढ यांचेसह संगणमत करून दिनांक १९.०९.२०२५ ते १७.१२.२०२५ दरम्यान वर नमुद बनावट औषधांचा साठा विक्री करून जनतेचा आरोग्यास धोका निर्माण केला अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि कुणाल दिघावकर ८००७८५९५२६ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४),३३६(३),३४०(२),२७८, ६०,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, | ३०४००८२ /२००३ | कलम ३७९ भा.दं.वि. | अजय मधूकर मिश्रा, रा. कुजीलाल पेठ, प्लॉट नं. १९, | २९.०४.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | | | बुध्दपुतळ्याचा मागे, अजनी नागपूर | |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०३१२ /२००२ | कलम ३२४ भा.दं..वी | गोविंद हरिषचंद्र हलके, रा. मोतीबाग झोपडपट्टी, वाहन ठिकाणजवळ, पाचपावली नागपूर | २७.०४.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**